Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

# हैं तय्यार हम...




**अभिनव इंटरनॅशनल स्कूल ग्रुप :** उजवीकडून डावीकडे रुपाली गाजरे, लता गुरुखेल, पुष्पा देवकर, शुभांगी पवार, गीता पठाडे, अनिता नाब्दे, सरिता राजपूत, संचालक डॉ. विजय वाडकर, राजश्री बनसोडे, स्नेहा वडगावकर, कीर्ती विसपुते, सरिता मेहेत्रे, विद्या निमोने, कविता तारे, अर्चना जैन.




**स्टायलो फर्निचर ग्रुप...** (डावीकडून उजवीकडे) लक्ष्मण गोर्डे, संतोष शर्मा, राहुल झांबड, घनश्यामसिंग चौहान, हरिभाऊ हिवाळे, धनंजय भोसले, अशोक तावरे, रमन लोया, कृष्णा थोरे.

## ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०९००, ०२४०-३०२९७८८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

**स्पर्धा**
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms



## दुर्गा बनली जादूगार !

दुर्गाच्या वाड्यात येण्याने एका मालिकेला एक वेगळे वळण मिळाले आहे. विद्युल आणि भूजंग दुर्गाला आपल्या कारस्थानामध्ये नकळतपणे सामील करून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. भैरवकरांचा वाडा सरस्वतीच्या नावावर असून जोपर्यंत दुर्गा त्या कागदपत्रांवर हस्ताक्षर करीत नाही, तोपर्यंत तो वाडा विद्युलच्या नावावर होऊ शकत नाही. पण, दुर्गा विद्युलच्या कारस्थानांशी पूर्णपणे अनभिज्ञ आहे, तरीही दुर्गा विद्युलला स्वतःच्या तालावर नाचवत आहे. दुर्गाचा वाड्यातील वावर खूपच एकदम बिनधास्त आहे. त्यामुळे मालिकेमध्ये एक प्रकारचे हलकेफुलके वातावरण तयार होते. दुर्गा लवकरच प्रेक्षकांना जादूगाराचे खेळ करताना दिसेल. दुर्गाच्या बिनधास्त, मनमोकळ्या आणि बेधडक स्वभावामुळे तिच्याकडून मनासारखा काम करून घेणे विद्युलला कठीण होऊन बसले आहे. दुर्गा कशी-कशी वागेल, कुठे काय बोलेल याचा काही नेम नाही. ती कुणालाच घाबरत नाही, या कारणामुळे दुर्गाला आपल्या तालावर नाचवणं विद्युलसाठी कठीण झालं आहे.

## शिल्पाने शेअर केले लाइफ सिक्रेट



एका रिॲलिटी शोच्या घरात जवळपास १५० कॅमेरे बसविण्यात आलेले असून, घरातील प्रत्येक सदस्यावर त्यांची नजर असते. सध्या घरात शिल्पा, आकाश, अर्शी, पुनीश आणि बंदगीचा एक गट तयार झाला आहे. हे पाच स्पर्धक घरात टाइमपास करण्यासाठी आपल्या जमान्यातील गोष्टी आपापसात शेअर करतात.

त्यासाठी 'मेरा पहला प्यार' हा टॉपिक ठेवतात. यादरम्यान हे पाचही सदस्य त्यांनी पहिला किस केव्हा घेतला, हे एकमेकांना सांगतात. शिल्पा शिंदे तिच्या पहिल्या प्रेमाचा किस्सा सांगते. ती म्हणतेय, की 'पहिल्यांदा मी ऑटोरिक्षामध्ये किस केला. दहावीत असताना मी पहिल्यांदा रिलेशनशिपमध्ये अडकले होते.' त्याचबरोबर ती तिच्या एक्स बॉयफ्रेंडचाही एक किस्सा शेअर करते. शिल्पा सांगते की, 'आम्ही रिक्षात बसलो होतो तेव्हा तो मला म्हणाला की, माझ्या मित्रांनी पैज लावलीय, की तू मला किस देणार नाहीस. तेव्हा मी म्हटले, एवढंच ना... जा त्यांना सांग, की मी तुला किस दिला. माझे हे शब्द ऐकून तो खूप खूष झाला. परंतु मी लगेचच बोलले, की मी किस दिला की नाही, हे बघायला ते येणार आहेत का? सांगायला काय जाते? हे शब्द ऐकताच त्याच्या चेहरा जणू काही कोमेजून गेला.'

## भक्तिसंगीत परंपरेचा वारसा जपण्याचे स्पर्धकांना आवाहन

भक्तिसंगीतावरील देशातील पहिला रिॲलिटी कार्यक्रम आता त्याच्या अंतिम फेरीकडे चालला आहे. उपांत्य फेरीतील चार स्पर्धक या स्पर्धेच्या विजेतेपदासाठी एकमेकांशी अटीतटीची स्पर्धा करीत असून उपांत्य फेरीत त्यांची कामगिरी पूर्वीपेक्षा जबरदस्त असेल, अशी अपेक्षा आहे. ही फेरी धमाकेदार करण्यासाठी भजनसम्राट अनूप जलोटा आणि नामवंत पार्श्वगायिका अल्का याज्ञिक हे उपांत्य फेरीत विशेष अतिथी परीक्षक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

अल्का याज्ञिकने सांगितले, 'या कार्यक्रमाच्या संकल्पनेचं मला फारच आकर्षण वाटलं. भक्तिसंगीतावरील एखाद्या कार्यक्रमाची नक्कीच गरज होती आणि मला त्यात थोडा काळ तरी सहभागी होता येत असल्याचा खूप आनंद होत आहे.' तर, अनूप जलोटा म्हणाले, 'भक्तिसंगीताची परंपरा आजची तरुण पिढी पुढे नेत असल्याचं पाहून मला खूपच मानसिक समाधान वाटतं. या कार्यक्रमातील सर्वच स्पर्धक फारच गुणवान असून मला त्यांचं गाणं प्रत्यक्ष ऐकता आलं, याबद्दल मी समाधानी आहे. सेटवरचं वातावरण गंभीर आणि शांत होतं.'





# दत्तक मुले बनली प्रसिद्ध सेलिब्रेटी!

बॉलिवूडमध्ये असे काही सेलिब्रेटी आहेत, ज्यांनी मुलांना दत्तक घेतले आहेत. त्यात रोहित शेट्टी, रविना टंडन, मिथुन चक्रवर्ती, सुभाष घई, सलीम खान, सनी लिओनी आदींचे नाव आवर्जून घेता येईल. हे सेलेब्स दत्तक मुलांचे संगोपन नीट व्हावे यासाठी खूप काळजीही घेतात. मात्र, लहानपणी दत्तक घेतलेली काही मुले अशी आहेत जी आज मोठी सेलिब्रेटी झाली आहेत. आपली वेगळी छाप सोडलेल्या काही दत्तक सेलिब्रेटींविषयी जाणून घेऊया.

cnx. Focus रवींद्र मोरे



## राजेश खन्ना

राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना. जतीनचे आईवडील भारत-पाकिस्तानच्या फाळणीनंतर भारतात आले आणि अमृतसरमध्ये राहू लागले. जतीनला त्याचे चुलते चुन्नीलाल खन्ना आणि लीलावती यांनी दत्तक घेतले. सिनेसृष्टीत पाऊल ठेवण्याआधी त्यांना राजेश खन्ना या नावाने लोक ओळखत. हेच नाव त्यांनी कायम ठेवले. १९६९ ते १९७२ या काळात त्यांनी लागोपाठ १५ सुपरहिट सिनेमे दिले. ते बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जातात.



## डिंपल कपाडिया

हिंदी सिनेसृष्टीत राज कपूर आणि नर्गिस यांची रोमॅंटिक केमेस्ट्री अफलातून होती. डिंपल कपाडिया ही या जोडीचे अपत्य मानले जाते.

नर्गिसने जेव्हा सुनील दत्त यांच्यासोबत विवाह करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा डिंपल हिला कपाडिया फॅमिलीकडे सुपूर्त करण्यात आले. 'बॉबी' चित्रपटातून डिंपलला लॉंच करण्यात आले. तेव्हा ही नर्गिससारखी वाटते अशी चर्चा सुरू झाली. ऋषी कपूर डिंपलकडे आकर्षित होतोय हे लक्षात आल्यानंतर राजकपूरने त्याला रोखले होते. ही तुझी बहीण असल्याचे समजावले होते.



## अर्पिता खान

सलमानची लहान बहीण अर्पिता बॉलिवूड सर्कलमध्ये सर्वपरिचित आहे. अर्पिता ही दत्तक मुलगी आहे. तिची सुटका मुंबईच्या फुटपाथवरून सलीम खान यांनी केली होती. नंतर याच मुलीला त्यांनी दत्तक घेतले. रडणाऱ्या या छोट्या मुलीला तुझे नाव काय असे विचारले असता रडत तिने अर्पिता हे नाव सांगितले होते. अशा तऱ्हेने ती प्रसिद्ध 'खानदाना'ची सदस्य झाली.



## स्टीव्ह जॉब्स

जगाचा ख्यातनाम टेक गुरू आणि एका मोठ्या इंडस्ट्रीजचा संस्थापक स्टीव्ह जॉब्स हे दत्तक व्यक्ती आहेत. त्यांचे दिवंगत वडील अब्दुलफत्ताह जंदाली हे सीरियन मुस्लीम होते आणि आई जोन्नी शिबल या ख्रिश्चन होत्या. त्यांचे आंतरधर्मीय संबंध स्वीकारले गेले नाहीत. म्हणून त्यांनी मुलगा स्टीव्ह याला पॉल आणि क्लारा जॉब्स यांना दत्तक देण्यात आले.



## मार्लिन मन्रो

हॉलिवूड चित्रपटांची 'प्रणय प्रतीक' बनलेली अमेरिकन अभिनेत्री, मॉडेल व गायिका मार्लिन मन्रो ही दत्तक मुलगी आहे हे ऐकल्यावर अनेकांना आश्चर्य वाटू शकते. एका गरीब अविवाहित महिलेल्या पोटी तिचा जन्म झाला. या मुलीला वाढवणे तिच्या आईला कठीण होते. तिचे बालपण सुधारगृहात आणि अनाथालयात गेले. तिचा जगण्यासाठीचा संघर्ष खूप मोठा होता. अखेर तिच्या आईच्या मित्राने तिला दत्तक घेतले.

## दीपिका म्हणाली, 'पद्मावती रिलीज होणारच !'



'पद्मावती' रिलीजला देशभर विरोध होत असला तरी कदाचित 'पद्मावती'ची टीम या विरोधाला पुरून उरणार असे दिसतेय. काही राजपूत संघटनांनी 'पद्मावती' रिलीज होऊ न देण्याची धमकी दिली आहे. त्यातच आता राजकीय नेत्यांनीही 'पद्मावती'ला विरोध चालवला आहे. अलीकडे 'पद्मावती'चे दिग्दर्शक संजय लीला भन्साळींनी विरोध शांत करण्याचा प्रयत्न केला. चित्रपटात इतिहासाचा अवमान होईल, असे काहीही नाही, असे त्यांनी सांगितले. पण याउपरही चित्रपटाला होत असलेला विरोध थांबला नाही, उलट तो वाढतोच आहे. हा विरोध बघून, या चित्रपटात राणी पद्मावतीची भूमिका साकारणारी दीपिका पदुकोन मैदानात उतरली आहे. 'पद्मावती' रिलीज होणे अतिशय गरजेचे आहे आणि हा चित्रपट रिलीज होण्यापासून कुणीही रोखू शकत नाही, असे तिने विरोधकांना सुनावले आहे.

## हेमा मालिनीच्या बायोग्राफीतून उलगडतील अनेक रहस्ये !



बॉलिवूडची ड्रीम गर्ल हेमामालिनी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची बायोग्राफी 'बियॉंड द ड्रीम गर्ल' लॉन्च करण्यात आली. ही बायोग्राफी एका मॅगजिनचे माजी संपादक आणि दिग्दर्शक राम कमल मुखर्जी यांनी लिहिली असून, हार्पर कॉलिन्सने पब्लिश केली आहे. शिवाय या बायोग्राफीची प्रस्तावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिली आहे. या बायोग्राफीत वाचकांना बऱ्याच गोष्टींविषयीचे रहस्य उलगडणार आहे, ज्याविषयी गेल्या चार दशकांपासून चर्चा सुरू होत्या. राम कमल मुखर्जी यांना ही बायोग्राफी लिहिताना हेमामालिनी यांच्या आयुष्याविषयी अनेक गोष्टींचा उलगडा होतो, ज्यात त्यांचे करिअर, लग्न याशिवाय बऱ्याच गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे. धर्मेंद्रने हेमामालिनीशी दुसरे लग्न केले होते. त्यांच्या पहिल्या पत्नीचे नाव प्रकाश कौर आहे. ज्यांना सनी आणि बॉबी देओल ही दोन मुले आहेत. तसेच हेमा मालिनीच्या ईशा आणि आहना अशा दोन मुली आहेत. हेमा मालिनी यांच्या या बायोग्राफीत त्यांच्या दोन्ही मुलींचा जास्तच उल्लेख करण्यात आला आहे. शिवाय यात त्यांच्या राजकीय वाटचालीचाही उल्लेख करण्यात आला आहे. त्यात पार्टी जॉईन करण्यापासून ते राज्यसभा-लोकसभा सदस्य बनण्यापर्यंतचा संपूर्ण प्रवास वर्णन करण्यात आला आहे. तसेच २०१५ मध्ये झालेल्या कार अपघाताचाही उल्लेख यात करण्यात आला आहे. या बायोग्राफीद्वारे पहिल्यांदाच हेमा मालिनी यांच्या आध्यात्मिक आयुष्याचा खुलासा होणार आहे. हेमा आणि जयललिता एकत्र तमिळ चित्रपटात डेब्यू करणार होते; मात्र तसे होऊ शकले नाही. याचाही उल्लेख यात करण्यात आला आहे. हेमा मालिनी चित्रपटात करिअर करणार नव्हती; मात्र असे एक कारण होते ज्यामुळे त्यांनी बॉलिवूड जॉईन केले. विशेष म्हणजे हेमा दक्षिण भारतीय असूनही बॉलिवूडमध्ये आली. यात उल्लेख करावासा वाटतो तो जितेंद्रचा. जितेंद्रशी हेमाचे अफेअर नव्हते; मात्र दोघांचे लग्न होणार होते. दोघांचे कोणत्या कारणाने बिनसले, याची सत्यता या बायोग्राफीत वाचायला मिळणार आहे.